म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३०
२१७१९७६

# बाष्पाञ्जलि.

त तीन आणे.

REFBK-0001334
REFBK-0001334

# बाष्पाञ्जलि



REFBK-0001334

प. वा. राजाराम गणेश आगाशे.

# "बाष्पाञ्जलि"

## अथवा

# पितृ-विलाप.

---

फेब्रुवारी १९१६

प्रकाशक:—नाडकर्णी आणि मंडळी
यांच्यासाठीं
अनंत आत्माराम मोरमकर; ८१ फणसवाडी, मुंबई.

प्रिंटर:—कृष्णराव सखाराम पाटकर,
श्री लक्ष्मीनारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई.

ग्रं. क्र. ९३३८ ... ३३ ... ग्रंथालय

# प्रस्तावना

आमचे मित्र रा. रा. गणेश जनार्दन आगाशे यांचा द्वितीय पुत्र **राजाराम** यास गेल्या वैशाख शु० ४ रविवारीं ( ता० १८ एप्रिल १९१५ रोजीं ) पुणें येथें देवाज्ञा झाली. **राजारामाचा** जन्म धुळें येथें फाल्गुन व० ५ शके १८१६ ( ता० १५ मार्च १८९५ ) रोजीं झाला. त्याचें मराठी शिक्षणास आरंभ धुळें येथेंच झाला होता, परंतु त्याचे वडिलांची बदली मुंबई येथें झाल्यावर गिरगांव म्युनिसिपल स्कूलमध्यें त्याचें पुढील मराठी शिक्षण पुरें झालें. इंग्रजी तीन इयत्तांचा अभ्यास मुंबईच्या 'आर्यन एज्युकेशन सोसायटी'चे शाळेंत करून त्याच शाळेंतून त्यानें हायस्कूल स्कॉलरशिप मिळविली. पुढें १९०८ सालीं त्याचे वडिलांनीं पेन्शन घेतल्यावर तो पुणें हायस्कुलांत दाखल झाला, व तीन वर्षांतच, ह्मणजे १९११ सालीं, तो युनिव्हर्सिटीच्या प्रवेशपरीक्षेंत पास होऊन गुणानुक्रमानें त्याचा ७ वा नंबर आला. सन १९१२ सालीं तो डेक्कन कॉलेजांत रुजू झाला व प्रवेशपरीक्षेंतील गुणानुक्रमाप्रमाणें दरमहा १० रुपयांची जूनियर स्कॉलर्शिप त्यास मिळाली. सन १९१२ चे नवंबर महिन्यांत तो **प्रिव्हियस** परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला आला, व संस्कृत विषयांत पहिला आल्यामुळें त्यास "विनायकराव जगन्नाथ शंकरशेट प्रैझ" आणि "बाई दयाकुंवर स्कालरशिप्" व "महाजनी प्रैझ" मिळून शिवाय

२० रुपयांची. सीनियर स्कालरशिपही मिळूं लागली. सन १९१३ सालीं **इंटरमीजियट** परीक्षेंतही पहिल्या वर्गांत पास होऊन ५२ रु. दरमहाच्या “ जैन लिटरेचर ” व “ वरजीवनदास माधवदास ” अशा दोन स्कालरशिपा त्यानें मिळविल्या. त्याच सालीं “ आपटे प्रैझ ”ही त्यास मिळालें. सन १९१५ चे मार्च महिन्यांत ता० १५ चे सुमारास त्यास ताप येऊं लागून निर्घृण काळानें त्यास ता० १८ एप्रिल रोजीं मृत्युलोकांतून ओढून नेलें !

अशा बुद्धिमान् व होतकरू विद्यार्थ्याच्या अकाल-निधनानें त्याचे गुरूजींस अत्यन्त दुःख झालें हें डेक्कनकॉलेजच्या प्रिन्सिपाल साहेबांनीं त्याचे वडिलांस जें दुखवट्याचें पत्र लिहिलें त्यावरून दिसून येतें:—

“ You have my most sincere sympathy on account of the loss of your gifted and brilliant son. His death has cut short a bright and promising life, and I am extremely sorry to hear of it. His is a great loss to our College.”

डेक्कन कॉलेजाच्या त्रैमासिकाचे जुलै १९१५ चे अंकांत संपादकांनीं जे दुःखोद्गार काढिले आहेत त्यांतील शेवटलीं दोन वाक्यें त्याच्या गुरुबन्धूंचा आदर व प्रेम व त्यामानानें होणारें दुःख याची उत्तम साक्ष पटवितात, ह्मणून तींही येथें देतों:-

" Mr. R. G. Agashe was not only intelligent, but his intelligence was backed by an equally high level of morality and love. We assure his unfortunate father who has lost his son in his old age that everybody who came in contact with his son in or out of college is a sharer in his unspeakable grief. There is no other consolation that others can offer to the unfortunate father than that his son is still *living* in the memory of others as in his own."

मृताच्या कांहीं रसिक मित्रांनीं त्याच्या कीर्तिरूप देहास मधुर पद्यकुसुमें अर्पण केलीं, त्यांतील कांहीं थोडीं निवडक पद्यें वाचकांस येथें सादर करितों:—

( १ )

* * *

होतास भूषणास्पद दक्षिणविद्यालयास तूं सखया ।
वाटे शून्य तुजविणें चन्द्राविण नभ जसें दिसे वांया ॥

* * *

कां जगदीशें तुजला, बाहियलें थोर कार्य करण्यातें ।
योग्य तसा तूं असशी, परि होई शोक अमित आम्हांतें ॥

* * *

थांबा, शोक पुरे हा, स्वर्गी जरि देह रामराजाचा ।
इहलोकीं भ्रमण करी आत्मा प्रेमार्द्र होउनी त्याचा ॥
आजवरी तनुबन्धन-योगें मर्यादित स्थितींत असे ।
परि तें नष्टचि होतां स्थिरचरसृष्टींत राहुनी विलसे ॥
**राजारामा** सखया, मंजुळ तव बोल अखिल विश्वांत ।
ऐकत, उन्मन कवि हा, सांठवि तव मूर्ति आत्महृदयांत ॥

( २ )

झगझगला दक्षिणविद्यालयगगनीं निजतेजानें ।
जो विश्रुत **राजाराम आगाशे** उपनांवानें ।
चाल । प्रत्येक परीक्षेमाजी ।
मेळवूनि यश तो गाजी ।
स्वकुलाची राखुनि बाजी ।
भूषण जो स्वकुला ठेला ॥
चरित तें तयाचें झालें आदर्शचि छात्रजनातें ।
सच्छिष्य पुत्र वा बन्धू भूषविलें तें तें नातें ।
चाल । जड देह यमें जरि हरिला ।
कीर्तिध्वज धवल स्फुरला ।
द्यावया स्फूर्ति तो उरला !
सान्त्वन नच अन्य मनाला ॥

* * *

अशा सद्गुणी व बुद्धिमान् पुत्राचे निधनानें त्याच्या वडिलांस अत्यंत दुःख होणें साहजिकच आहे. त्यांस आलेला शोकाचा उमाळा पद्यरूपानें बाहेर पडला. तो कित्येक प्रेमळ मित्रांच्या विनंतीस मान देऊन महाराष्ट्र वाचकांस आम्हीं, त्यांच्या परवानगीनें, सादर केला आहे.

# "बाष्पाञ्जलि."

राजारामा ! किति तरि तुझ्या आठवूं सद्गुणातें ?
कैसा आतां तुजसि विसरूं ? सान्तवूं वा मनातें ?।
जी माझा तूं सुत म्हणुनियां धन्यता मानियेली
मच्छोकातें द्विगुण करण्या हेतु ती आज झाली !

माझ्या पोटीं तव जनन हें मानिलें भाग्य मोठें
तूं गेल्यानें मजसि तितुकें तेंच दुर्भाग्य वाटे ।
होतें जाणें नियत तरि बा ! कासया ते अमूप
केले बाळा ! गुण, हृदयिं जे टोंचती शल्यरूप ?

ज्येष्ठं "अप्पा"* म्हणुनि तुजला कौतुकें बाहियेलें
भावंडांनीं वडिलिंहि तुझें नांव तें रूढ केलें ।
धुंडाळीती घरभर मुलें त्याच नांवें तुला बा !
तूं गेल्यानें अहह ! घरची लोपली सर्व शोभा !

---

* वडील बंधु.

छायाचित्रा तव बघुनिया नाचुनी बोट दावी
"अप्पा! अप्पा!"म्हणुनि टकळी धाकुटा छोटु*लावी।
तो वर्षाचा, प्रतिदिनिं तुला आठवी बाळ सान !
काळाच्या ह्या अदय कृतिचा सर्वथा तो अजाण!

[ १ ]

शोकावेगें प्रथम दिवशीं लोपलें देहभान
गेली कोठें न मज कळली भूक किंवा तहान ।
बाल्याचें स्वचरित सगळें मानसीं आठवोनी
उच्चाक्रंदें रडत बसलों धाय मी मोकलोनी.
होती तेव्हां स्तिमित पडली शोकपर्यस्तगात्री
त्वन्माता ती स्मरुनि तुजला अश्रु ढाळीत नेत्रीं ।
होती माझ्याहुनिहि जरि ती ग्रासिली घोर शोकें
उच्चाक्रंदा मम परिसुनी बोलली ती विवेकें:-
"आक्रोशानें परत तुमचा काय येईल राजा ?
नाहीं कां हो विकल तुमच्या सारखा जीव माझा ?।
जें माशानें स्वमुखिं गिळिलें मागुती तें न येतें
ठावें सारें म्हणुनि नलगे सांगणें आपणातें.
केल्या ऐसें रुदन इकडे, बाळकें हीं अजाण
टाहो मोठा करितिल, तयां धीर देईल कोण ?।
तींही शोकें जणुं दडपलीं बापडीं दीनवाणी
त्यांना कांहीं तरि समजवा दुःखशोका गिळोनी!"

* वडील बंधूचा मुलगा.

[ २ ]

भार्येचें हें वच परिसुनी धैर्य-गांभीर्य-युक्त
शोकावेगा गिळुनि, करुनी चित्त यत्नें प्रशांत।
डोळे दोन्ही पुसुनि बसलों स्तब्ध जों मी क्षणार्द्ध
तों तो झाला विफल अवघा चित्तसंक्षोभरोध.
कासाराचें जल उफळतां पात्रिं जेव्हां न मावे
तेव्हां वेगें अगतिकचि तें बांध फोडूनि धांवे।
तैसा क्षोभें वर उफळतां शोकरूपी उमाळा
डोळे माझे फिरुनि भरले, कंठ दाटूनि आला.
सोसेनासा प्रसभ मज तो तीव्र आवेग झाला
तेव्हां चित्तीं मजसि गमलें मार्ग द्यावा तयाला।
भार्येला मी म्हणुनि वदलों कीं–"सुता आठवोनी
पद्यांमध्यें रुदित सगळें ठेवितों सांठवोनी."

[ ३ ]

राजारामाभिधचि चुलते तासगांवांत होते
त्यांच्या नांवें विदित नगरद्वार* अद्यापि तेथें।
त्यांच्याठायीं अतिशय मनीं प्रीति होती म्हणोनी
मत्तातानें तुजसि अभिधा ती दिली आदरोनी.
तूं दीर्घायू निज सुचरितें, विक्रमी भाग्यशाली
आपद्ग्रस्तां सकल सुजनां थोर होशील वाली !।
सांभाळोनी स्वकुलबिरुदा कीर्ति संपादशील,
ऐशी आशा तयिं धरिलि ती जाहली आज फोल !

*तासगाव जिल्हा सातारा येथें भिलवडीवेशीला राजारामपंत आगाशांची वेस म्हणतात.

"राजाबा" या प्रिय मधुरशा शब्दिं मारूनि हांक
प्रेमें अंकीं बसवुनि तयीं लाड केले अनेक।
चौदा * वर्षं विरह घडला, जाहला तो असह्य
नेलें त्यांनीं जवळ म्हणुनी हांक मारुनि काय ?
आजोबांचा बहुतचि लळा त्यामुळें एक काळीं
गांवीं गेल्यावर निघुनि ते, खंति त्वां फार केली।
आला तेव्हां ज्वर, मग पुढें गांठिलें गोंवरानें
झालों आम्ही तधिं उभयतां ग्रस्त चिंताज्वरानें.
त्यावेळीं जी बसलि कडकी तीमुळें फार रोगी
झाली बाळा! कृश तनु तुझी, वृत्ति तेंवी विरागी।
वैद्यें जेव्हां तुजसि कथिलें कीं करंजी कुपथ्य
त्वां टाकोनी दिधलि, धरिला तोच निर्धार नित्य.

[ ४ ]

जैशी बुद्धि प्रकटचि तुझी वानियेली कुशाग्र
तैसें शील स्तवितिच, तुझें नांव घेती समग्र।
अव्यंगत्वें तुजसि घडितां सर्वथा पक्षपात
देवें केला, म्हणुनि मज हा जाहला वज्रघात !
भावंडांना प्रियतम तसा सर्वही आप्तवर्गा
सौजन्याचा निधि म्हणविलें, धन्य केलें निसर्गा।
अन्तर्यामांतिल गुण जसे पावले बा विकासा
तूं स्वीयांना, इतरहि जनां वाटलासी हवासा !

* आजोबा सन १९०१ सालीं निवर्तले.

तूं संतोषी, स्थविर यतिसा संयमी, नित्ययोगी
विद्याभ्यासीं सतत रमलें चित्त, केव्हां न भोगीं।
योगभ्रंशें तव जनन कीं संचिता भोगण्यातें
झालें किंवा धवल करण्या कीर्तिनें मत्कुलातें ?

झाला नाहीं तुजसि कधिंही स्पर्श बाळा ! रजाचा
सत्त्वोद्रेकें विमल हृदयीं पाड कैंचा तमाचा ?।
स्वाध्यायाची विरति न कधीं, केवळ प्राणधारी
बा ! गेलासि त्रिदिविं म्हणुनी योगिसा ब्रह्मचारी !

वाग्ब्रह्माची अविरत तुला ती घडावी उपास्ती
यासाठीं त्वां विषयिं धरिली सर्वथा कीं विरक्ती !।
स्वाध्यायाच्या नियत पठना मात्र तूं देहधारी
या अर्थींही खचित सखया ! नैष्ठिक ब्रह्मचारी !

[ ५ ]

आले कन्या किंतिक तुजला द्यावया लोक थोर
केला यत्नें बहुविध मला त्यांहि निर्बन्ध फार ।
दुःखामध्यें सुखचि गमतें, मागणी ती तयांची
मानायातें मति न धजली, हे कृपा श्रीहरीची !

केला बाळा जरिहि असता शैशवीं त्वद्विवाह
माझ्या नेत्रांतिल न खळता अश्रुधाराप्रवाह ।
त्वां प्रेमानें वरिलि दयिता नोवरी जी सुकीर्ती
मागें राही, परि मम मना तीच दे आज शान्ती !

[ ६ ]

प्राज्ञीं, देवद्विजगुरुपदीं, ठेविली योग्य निष्ठा
त्यायोगानें मिळविलि तुवां अल्पकालीं प्रतिष्ठा।
दुःशब्दाचा चुकुनिहि मुखें नाहिं उच्चार झाला
थारा कैंचा तव शुचि मनीं दुष्ट दुर्वासनेला ?
स्वाध्यायानें स्वमन करुनी शुद्ध, शांत प्रसन्न
शुश्रूषेनें गुरुजन तसे वृद्धही तोषवून।
गाढ प्रेमें सुखवुनि निजां सोदरां स्वावतार-
कार्यान्तीं त्वां गमन वरिलें स्वर्गसौख्या अपार !
उत्कर्षाचें स्वमनिं धरुनी ध्येय धर्मानुरोधें
चारित्र्यातें अनघ खचिलें पूर्ण तत्त्वावबोधें।
पुत्र, भ्राता, गणुं तुजसि वा छात्र वा मित्र तें तें
केलें राजा ! समुचितगुणीं श्लाघ्य सर्वांशि नातें.

[ ७ ]

आहे लोकीं प्रथित बहु जी " दक्षिणा-पाठशाला "
जेथें विद्यागम मम, तसा मामकांचाहि झाला।
आम्हांपेक्षां अधिक यश बा ! तेथ त्वां जोडियेलें
स्वोत्कर्षानें अमरचि तुवां आपुलें नांव केलें !
तेथें आतां स्मरुनि तुजला त्वद्गुरू धन्यवाद
जो देती तो परिसुनि पुन्हां वाढतो मद्विषाद।
वाटे शिष्यस्थितिंतहि जरी जोडिली हे सुकीर्ती
प्रौढावस्थागमिं पसरती कां न सर्वां दिगन्तीं ?

जो केला त्वां प्रतन-नगरें[1] दाखवाया नकाशा
त्वद्भाग्याची उपजलि तया पाहतां थोर आशा।
काव्यादर्शा[2] करुनि दिधली जी तुवां श्लोकसूची
ठेली माझ्याजवळ तुझिया स्मारिका जीविताची.
माघग्रन्थीं सहज सुचला श्लोक शोधावयातें
जातां, पोटीं बघुनि तुझिया शीसका-लेखनीतें।
त्वत्पाठाची ठळक जरि ती खूण ही शल्य झाली
आले अश्रू स्वकरिं पुसुनी ठेविला ग्रंथ खालीं !
कोठें कांहीं तरि मज तुझा सांपडे हस्तलेख
येई पोटीं भडभडुनियां, नष्ट होई विवेक।
होतां ऐशी सतत तुझिया टोंचणी सद्गुणांची
चित्तीं माझ्या क्षणभर तरी विस्मृती होय कैंची ?

[ ८ ]

पुष्पोद्यानीं नवकिसलयोद्भिन्न पर्णीं विलीन
चांपेयाचा[3] लुसलुशित तो कोरक स्वर्णवर्ण।
होतो काळें विकसित ऋतु प्राप्त होतां वसन्त
आमोदानें दरवळुनि दे सर्वही आसमंत.

---

१ दशकुमारचरितांतील स्थळें दाखविण्याकरितां प्राचीन हिंदुस्तानाचा नकाशा.

२ दण्डिकृत काव्यादर्शातील उदाहरणार्थ दिलेल्या श्लोकांची वर्णानुक्रमानें सूची.

३ चांफा.

तैसा तूंही मृदुकुसुमसा शैशवीं, गौरवर्ण
शालिन्यानें गुण सकलही झांकुनी फार लीन ।
झाला जेव्हां तव हि सखया ! यौवनायुःप्रवेश
तेव्हां सारे गुण विकसले, दाटला तत्सुवास.

[ ९ ]

थोडी कोठें कळि उमलली, पूर्णतेला सुगन्ध
नाहीं आला, परिणत तसा नाहिं झाला मरन्द ।
जों आरंभीं भ्रमर भंवतीं गोड गुंजारवातें
तों तें जाई सुमचि सुकुनी तीक्ष्णशीताभिघातें !
तैशी राजा ! न तव तनुची वाढही पूर्ण झाली
अल्पायुष्यें तव गुणतती अंतरीं गूढ ठेली ।
कोठें थोडा तव पसरला जो जनीं धन्यवाद
तों त्या जागीं तव विरहिं बा दाटला तीक्ष्ण खेद !
वृक्षस्कन्धीं फळ लटकलें, तेथ पाडास आलें,
वर्णें, स्वादें मधुर खुललें, पाहतां नेत्र धाले ।
एकाएकीं गळुनि पडतां होतसे खिन्न माळी
तैसा मीही अवचित तुझ्या या वियोगें अकाळीं !

[ १० ]

नाहीं बाळा ! तुजसि दुखणें चार वर्षांत आलें,
वाटे बाळग्रह उलटले, विघ्न कांहीं न ठेलें ।
एकाएकीं जणुं उगविण्या सूड फारा दिसांचा
काळानें हा निपट खुडिला मोड आशातरूचा !

तूं झालासि व्यथित, अगदंकार मोठे प्रवीण
आले, केले बहुविध तयीं औषधोपाय तीक्ष्ण ।
त्यांच्या पायां पडुनि वरिली म्यां त्वदारोग्यभिक्षा
मद्दुर्दैवें परि नच तयां जाहली बा! परीक्षा!

प्राग्जन्मींचीं विविध असतीं संचितीं घोर पापें
तीं तीं येथें प्रगटुनि नरा घेरिती रोगरूपें ।
तेथें धन्वन्तरि उतरुनी काय बेटा करील?
प्राक्कर्मांचें कटु फल कसें स्वोपचारें हरील?

आयुष्याची बळकट जरी ईश ठेवील दोरी
येतो रुग्णा गुण जपतपें, तेंवि वैद्योपचारीं ।
दोरी मूळांतुनि जरि तुटे, यत्न ते मानवाचे
होती सारे विफल, न कळे गूढही जीविताचें!

गंडे, दोरे, नवस, जपही, ग्रंथपारायणादी
केले सारे तव न हरली व्याधि, माझी न आधी ।
केले धांवे, परि न करुणा देवपादास आली
कांहीं केल्या नियति न टळे, बुद्धि हे ठाम झाली!

वाटे केले फुकटचि तुझे हाल, तापोपशान्ती
नाहीं झाली, म्हणुनि हृदया वाटते फार खंती ।
अज्ञानानें तुजसि दिधले कष्ट, ते सोशियेले
सत्त्वोत्कर्षा निमुट सगळें सोसुनी व्यक्त केलें!

हा सत्त्वाचा समुदय तुवां वीस वर्षांत केला?-
पूर्वींच्या कीं सुचरितबळें जन्मतः सिद्ध ठेला?
जो रुग्णाचा तिरसटपणा सर्व लोकांसि ठावा
तोही नाहीं तुजसि शिवला शान्तिचा काय ठेवा?

[ ११ ]

"गेला गेला !" परिसुनि तुझ्या बन्धुच्या क्रन्दितातें
पोटीं माझ्या भरलि धडकी कीं जणूं वज्रघातें ।
कानीं माझ्या अजुनि घुमती दुष्ट ते शब्द दोन
जातो त्यांचें स्मरण घडतां जीव हा घाबरून.

पञ्चत्वाच्या क्षणिंहि न तुझी लोपली लेश शुद्धी
होती नित्यापरि विशद ती तीक्ष्ण निश्चिन्त बुद्धी ।
"आई" ऐसें वदुनिच तिच्या स्कन्धिं ठेवूनि माथा
अक्लेशानें त्यजुनि तनु ही भेटलासी कृतान्ता !

"आई" ऐसें वदुनि सखया घेतला कीं निरोप !
मायापाशा निवटुनि तुवां लाविला ज्ञानदीप ! ।
आसक्ती जी तव शिशुपणापासुनी ग्रन्थि होती
तीही एका क्षणिं निरसुनी पूर्ण केली विरक्ती !

शय्यास्थान त्यजुनि पहिलें उत्तरासंमुखीन
देहत्यागक्षण जवळ तो पातता त्वां उठून ।
केली दृष्टी अभिमुख तुवां आपुली सूर्यपादीं
कीं गांठावा निजपथ तया श्रेणिनें अर्चिरादी.

कीं सूर्याच्या करिं बघुनि वा विश्व हें हर्षपूर्ण
व्हावें स्वान्तःकरण हि सुखें स्वर्गयानीं प्रसन्न ! ।
किंवा नोहे तुजसि पुढती जन्म येथें म्हणून
या लोकातें क्षण निरखिलें काय डोळे भरून !

बाळा ! कां त्या दिनिं बघितली वाट साडेदहाची ?
कीं जन्माचा समय अथवा वेळ भोगक्षयाची ? ।
होता ठावा तुजसि अथवा आपुला अन्तकाळ ?
किंवा इच्छामरणि म्हणुनी साधिली तीच वेळ ?

सुट्टी होतां मधुर-वचनीं स्नेहधर्मानुरूप
त्वां मित्रांचा, मजसि कथिती घेतला बा ! निरोप ।
नाहीं होणें पुनरपि पुढें भेट ऐसें तयांतें
त्वां निक्षोनी म्हणति कथिलें ! ज्ञात कां मृत्यु तूतें ?

[ १२ ]

झोंपीं गेल्यापरिस गमली सौम्य, गंभीर मुद्रा
कोणालाही नकळत कशी लागली कालनिद्रा ।
काळाचे जे अनुचर तुझा प्राण आले हराया
वाटे तेही न तव धजले कान्तिभङ्गा कराया !

मृत्यूनेंही न तव हरिलें शान्तिचें सौम्य तेज
मर्त्याकारें कवण मुनिचा तूं जणूं पुण्यपुञ्ज ।
पुण्यात्मे ते पडति सरतां पुण्य, तारास्वरूपें
तारारूपें त्रिदिविं चढसी तूंहि पुण्यप्रतापें !

बा शुभ्रांशो ! सुखकर तुझें तेज कोठूनि आलें ?
पुण्यात्म्यांचें धवल यश कीं चोरुनी सांचवीलें !।
माझ्या राजासमच मजला भाससी सौम्यमूर्ती
त्याच्या तेजा हरुनिच तुवां केलि कीं आत्मपूर्ती!

[ १३ ]

तत्त्वज्ञानें भयचि मृतिचें जिंकिलें ज्या नरानें
वाटे त्यानें मरणचि असे मारिलें योगियानें ।
मातेच्या त्वां बघुनि नयनीं अश्रुधाराप्रणाली
आश्वासोनी तिजशि, पुशिली ती स्वयें अंतकाळीं.

" भूतग्रामीं नच मम पुन्हां संग केव्हां घडावा
चौऱ्यांशीचा नच मज पुन्हां व्यर्थ फेरा पडावा ।
जे प्राग्जन्मीं असतिल विभो ! वंचिले घोर रोग
ते ह्या देहा घडवुत सुखें आपुले दुःखभोग.

" राहो कांहीं ऋण न पहिलें येथ फेडावयाचें !
जावो सारें तुटुनि हृदयीं मूळही वासनांचें !।
पांचां भूतीं मिसळुनि पुन्हां स्थूल हा देह जावो !
हा जीवात्मा तव पदिं विभो ! पूर्ण विश्रान्ति पावो !"

गांगेयानें शरशयनिं ही प्रार्थना शुद्धभावें
केली,–जीचें मनन करितां मृत्युभीती दुरावे !
ती त्वां केली, म्हणुनिच तुझ्या अंतरीं अंतकाळीं
देहत्यागीं तळमळ जिवा लागुनी नाहिं ठेली !

गीतार्थांचे बहुविध तुवां ग्रंथ जे मेळविले
वाटे त्यांचें स्वमनिं सगळें सार त्वां बिंबवीलें ।
निष्कामत्वें निज उचित तें सर्व कर्तव्य केलें
त्या योगानें तव मन सख्या ! वासनाशून्य झालें !

[ १४ ]

आत्मज्योतीरहित शव तें काष्ठलोष्ठांसमान
आत्मस्वीय त्यजुनि फिरती मागुती खिन्न दीन ।
आत्म्यासंगें सहचर सदा धर्म जाई परत्र
हें जाणोनी सतत सखया ! सेविला धर्म मात्र !

बाळा ! स्वर्गीं उदगयनिं तूं यान केलें मुहूर्तीं
वैशाखाची तिथि बघुनियां शुक्लपक्षीं चतुर्थी ।
नोहे शंका तुजसि उघडा मार्ग तो अर्चिरादी
शुद्धब्रह्मीं लय नियत बा जेथ नोहे उपाधी.

मात्रास्पर्शें सुख असुख वा, इन्द्रियांचा प्रमाथ
क्षुत्तृष्णेचा इतर अथवा ताप ठावा न जेथ ।
नाहीं कांहीं कलह, भय वा, शोक वा, जेथ रोग
नाहीं जेथें प्रणयकृतही केधवां विप्रयोग.

पिण्डश्राद्धीं वसुगणिं तुझा जाहलासे प्रवेश
त्यायोगें बा ! नियत तुजला अन्तरिक्षीं निवास ।
तेथोनीही तव गमन तें रुद्रलोकीं घडेल
आदित्याच्या भुवनिं मग तूं तेथुनी पोंचशील !

ऐशा लोकीं सुखमय तुझा सूक्ष्मदेहीं निवास
पारंपर्यें पुढति नियत ब्रह्मलोकीं प्रवेश ।
अन्तीं मायावरण सुटतां प्रौढपुण्यप्रतापी
कैवल्याच्या वरिशिल सुखा सच्चिदानन्दरूपीं !

[ १५ ]

आत्मा शुद्ध स्फटिक फलकासारखा जन्मकाळीं
पापीं त्याच्यावर नव पुटें बैसतीं कुट्ट काळीं ।
त्वां तों बाळा ! सकळ पहिल्या संचिता क्षाळियेलें
संपादोनी अधिक सुकृता जन्मसाफल्य केलें.
जन्मा आल्यावर निरसण्या प्राक्तना संचितातें
त्याशीं धैर्यें झगडुनि तुवां दाविलें पौरुषातें ।
अन्तीं त्यानें तुजसि हरितां दाविली आत्मशक्ती
त्वांही लोकीं स्थिर उरविली पौरुषाची सुकीर्ती !
प्राक्कर्मांचा क्षय सुचरितें अल्पकाळांत केला
त्वन्मोक्षाचा पुढति सगळा मोकळा मार्ग झाला ।
पुण्यें केला जवळचि तुवां ईश या भावनेनें
धैर्यें लोटूं दिवस उरले ईश्वराच्या कृपेनें !

[ १६ ]

हर्षें सुस्वागत दिविपदीं योग्य केलें असेल
त्यांच्या संगें अमित सुख तूं सर्वदा भोगिशील ।
या लोकींची स्मृति जरि तुला जाहली तेथ बाळा !
आम्हांसाठीं विनवि करुणासागरा विश्वपाळा !
या लोकींची स्थिति सकलही दृश्य त्या लिङ्गदेहीं
ऐसें कोणी कथिति, जरि तें सत्य बा ! तूंचि पाहीं ।
त्वद्विश्लेषें किति तरि असूं सर्वही ग्रस्त शोकीं
नाहीं त्याची अहह ! अमरां कल्पना काय नाकीं ?

ज्ञात्यांनाही यमनियमनें नावरे पुत्रशोक
ऐसें आले कथित सगळे आजपर्यंत लोक ।
आलें आतां मज अनुभवा, सर्व हें विश्व शून्य
भासे, वाटे सकलहि जनीं एकटा मी अधन्य !

ब्रह्मज्ञाना कथित इतरां आजपर्यंत आलों
घाला माझ्यावरिच पडतां सर्वथा चूर झालों ! ।
जें म्यां लोकांप्रति शिकविलें तें क्षणीं नष्ट झालें !
गात्रें सारीं शिथिल पडलीं, धैर्य माझें गळालें !

अन्तश्चक्षूपुढति उमटे कल्पना चित्र जें तें
रेखाटाया पुसटहि मला शब्दरंगीं न येतें ।
चिच्छक्तीनें अविकलपणें केवल ग्राह्य ऐसें
शब्दें हीनें विशद करितां पामरां येइ कैसें?

ऐशी आहे स्थिति, तरि फुटे शोकरूपी उमाळा
तो चिद्वृत्ती करपवि जसा वृक्ष, वेली उन्हाळा ।
त्यातें श्लोकीं प्रकट करितां, जोडितां पद्यबन्ध
मात्राप्रासादिक जुळवितां होय चित्ता विनोद !

शब्दीं शब्दीं नकळत किती लोटले अश्रु नेत्रीं
ठायीं ठायीं अचुक गळले शुभ्र ते लेखपत्रीं ।
थेंबीं थेंबीं पुसट सगळीं अक्षरें काजळीनें
अन्तर्यामांतिल कलुषता हारिली लेखनीनें !

[ १७ ]

ब्रह्माण्डातें रवि उजळितो स्वीय दिव्य प्रकाशें
त्वां चारित्र्यें कुल उजळिलें, थोर सत्कीर्तिशेषें ।
जातां अस्ता द्युमणि, तिमिरें व्याप्त हो विश्व सारें
त्वद्विश्लेषें मम हृदयही व्याप्त शोकान्धकारें.

प्राणापेक्षां प्रियकर गमे पुत्र मातापित्यांला
होतां पुत्रा असुखलवही क्लेश त्यांच्या जिवाला ।
येतां त्यातें निधन, मग त्या काय शोका पुसावें !
दुर्दैवी जे मजसम तयां मात्र तें होय ठावें !

आवेगानें हृदय उडतें, कंठ दाटूनि येतो
हाले नासापुट, अधरही, श्वास कोंडूनि जातो ।
वाटे जाती असुहि गळुनी अश्रुधाराप्रवाहीं
सीमा कोठें अवनितलिं या पुत्रशोकास नाहीं !

मूर्ती डोळयांपुढति दिसते, तेथुनी ती न हाले
रात्रीं सुद्धां शयनिं पडतां झांकती हे न डोळे ।
वारंवार स्मरण घडतें, आठवे त्वच्चरित्र
शोकाक्रन्दें हृदय फुटतां तोहि वाटे पवित्र.

'अंगादंगाद्' अवयव, घडे जन्म हृत्कोटरांत
साक्षात् आत्मा सुत म्हणविला राहुं वर्षें शतान्त ।
ऐसें बोले श्रुति, न कवणा होय तैशी प्रतीती
वांचो माझा सुत 'शत-शरद्' ही न कोणास आर्ती ?

[ १८ ]

जन्मप्राप्ती प्रथम पितरां स्नेहरज्जूंत गोंवी
बाल्याचें तें चरित पुढती प्रीतिला त्या दुणावी ।
जो जातो तो प्रतिदिन करी घट्ट त्या प्रेमपाशा
अन्योन्याच्या ग्रथित करितों एकमेकीं सुखाशा !

मैत्री होते सहज पडतां पावलें सात संगें
नोहे कांहीं नवल तनयप्रीतिनें चित्त रंगे !
अन्नीं, पानीं शयनिं, वसनीं संगती नित्य ज्यांचीं
मायापाशें नवल न जरी बद्ध चित्तें तयांचीं !

या प्रीतीनें गवसण असे घातली या प्रपंचा
प्रेमापोटीं निपजत असे साहचर्याभिवांच्छा ।
प्रेमाभावीं न जनहृदयीं दुःखशोकास थारा
मायापाशीं परि गवसिला हा जगाचा पसारा.

"या प्रेमाचा उगमचि मनीं केधवां होउं नेदी
आसक्तीचें दृढपरिकरें सर्वथा मूळ छेदी"।
ऐसा "ज्ञाते" कवण करिती गोडसा बुद्धिवाद
वाटे मातें परि सकळ हा सृष्टधर्मा विरोध !

ही वैराग्यस्थिति मज गमे घातुक स्नेहमूला
संसारातें, असुलभ तशी प्राकृता पामराला ।
जातां प्रेमास्पदजन, जरी अश्रुनीं कंठ दाटे
प्रेमाभावाहुनि मजसि हा शोकही श्रेय वाटे.

होणें नाहीं अतुल कनकें प्रीतिचें योग्य मोल
नोहे प्रीती, तरि मग सुखें अन्य होतात फोल !
"प्रीती लाभाविण कळवळा" तथ्य हे साधु-वाणी[1]
प्रीतिच्छेदाहुनि अधिक ती कोणती अन्य हानी ?

[ १९ ]

जागोजागीं गृहिं पसरलीं पुस्तकें सानमोठीं
मद्धैर्यातें जणुं बघति तीं लावुनीयां कसोटी ।
जी ती वस्तू मजसि तुझिया दे स्मृती जीविताची
कैशी यावी जडपणिं तिला कल्पना मत्स्थितीची ?

जेऊं, खाऊं, प्रतिदिवसिच्या वावरूं कामधामीं
जेथें तेथें घडिघडि तुझी पाहुं जागा रिकामी !
ऐशीं दृष्टी सहज पडतां स्मारकें जागजागीं
कैसे आम्हीं विसरुं तुजला पुण्यवन्ता अभागी ?

[ २० ]

निद्रा, मृत्यू उभय गणिती अल्पअंशीं समान
भावंडें तीं म्हणविति, परी एकमेकां अजाण ।
निद्रावस्थानुभव असतां मृत्यु तेथें न येई
मृत्युग्राहीं पळभर तया स्थानिं निद्रा न राही !

---

१ 'कळवळ्याची जाती' करी लाभाविणें प्रीति ।
तुकाराम.

ही मृत्यूची बहिण असतां नोळखी त्यास निद्रा
या योगानें मजसि तव ती दाखवी हास्यमुद्रा !
तूं गेल्याचें तिजसि न खपे स्वप्नही, या गुणानें
वाटे निद्रा प्रिय मज तुझ्या दुर्लभा सन्निधानें !

[ २१ ]

स्वच्छंदानें सदनिं लिहितां, वाचितां वेळ गेला
गेला तोही मज न कळला, चित्तिं संतोष ठेला ।
आतां मात्र स्वगृहिं अथवा दूर रानावनांत
कोठें केंव्हां मज न करमे, सौख्य नोहे कशांत !

वस्तू जातां तळमळ मना नित्य लागूनि राही
ती आहे तों परिचयवशें तींत वाटे न कांहीं ।
तैसें राजा ! अनवहित जें त्वद्गुणीं चित्त होतें
आतां त्यातें स्मरुनि शतधा तेंच फाटूनि जातें !

जें दृष्टीला कधिं न पडतें राहि त्याचें न भान
ऐसें लोकीं म्हणति परि तें भासतें अप्रमाण ।
राजा ! आतां न इह भुवनीं तूं जरी विद्यमान
आहे रात्रंदिवसहि तुझें मन्मनीं सन्निधान !

झाली मातें तुजविण सुता ! सर्व सृष्टी उदास
जेथें तेथें तुजसि बघतों, होतसे बा हताश !
तोंडीं येतें नकळत तुझें, लाडक्या ! गोड नाम !
भासे डोळ्यांपुढति मुख तें गोड मत्सौख्यधाम !

[ २२ ]

जों बाळा ! त्वां प्रकृतिगुण ते आपुले व्यक्त केले
तों भाग्याच्या शिखरिं मजला वाटलें बैसवीलें ।
आतां वाटे मज ढकलिलें उंच शैलावरून
आशारूपी सुखद तनुच्या अस्थि गेल्या चुरून !
या डोळ्यांनीं सुचिर तुझिया वैभवातें बघावें !
या कानांनीं श्रवण तुझिया लौकिकाचें करावें !
या चित्तानें तव गुणगणीं नित्य संहृष्ट व्हावें !
मद्वंशाचें प्रतनु यश तें त्वत्प्रकाशें स्फुरावें !
ऐसें मोठें स्वरचित मनोराज्य तें ध्वस्त झालें
वाळूमध्यें सदन रचिलें तें जलें भग्न केलें !
मर्त्यत्वातें मनिं विसरलों, घेरिलों सान्द्र मोहें !
आतां चित्तीं उमज पडला, क्रंदुनी अर्थ नोहे !

[ २३ ]

एकान्ताचा क्षणहि मजला हो किती दुःखदायी
याची अन्या लवभर कधीं कल्पना शक्य नाहीं ।
गेलें माझें सुख, हरपलें भाग्य या भावनेनें
राजारामा ! तुजविण जिणें सर्व कंटाळवाणें.
देतां येता जरि लव तुला अंश मज्जीविताचा
आनंदानें तुजसि असता म्यां दिला, तो फुकाचा ।
झालों आतां गलित, पिकलों, जाउं केव्हां पडोनी
नोहे आम्हां भुवनिं उरलें कार्य कांहीं जगोनी.

ग्रं. क्र. ९३३८

देऊं केलें मजसि असतें राज्य कोणी नृपानें
राजारामा! तुजसि नसता त्यां दिला, देव जाणे।
या काळाच्या पुढति थकले सर्व माझे उपाय
केला दैवें तुजसि हरितां मर्मि माझ्याहि घाय !
ठावें साऱ्या त्रिभुवनिं मला प्रेय ऐसें न कांहीं
ओंवाळूनी तुजवरुनि जें टाकितों मी न तें ही !
जी झाली ती नच भरुनि ये हानि आतां कशानें
ईशेच्छेच्या विण न दुसरें मी समाधान जाणें.

[ २४ ]

जेथें तेथें मजसह तुझी येतसे रम्य मूर्ती !
निद्रा भूतें जड करि, परी लेश नोहे सुषुप्ती।
या लोकींची क्षणिक वसती सर्वथा हा विवेक
चित्तीं येतांक्षणिंच वितळे, नावरे पोटिं शोक.
बाले किल्ल्यावर वसतसे आत्मराजा विविक्तीं
बुद्धी तैसें मनहि करिती दुर्गरक्षा सभोंतीं।
जेव्हां पूर्वस्मृति बहुजवें तोफ डागी धडाडा
तेव्हां बुद्धी, मन लटपटे, दुर्ग डोले कडाडा.

[ २५ ]

अन्तर्यामीं सखल खचला, ऊतुं जाया मिळेना
चाले मोठी खळबळ, परी ताप कोणा दिसेना।
पारा जैसा पुटिं निमुटसा अग्नितापास साही
तैसें माझें मन तळतळे घोर शोकाग्निदाहीं !

" इन्द्रियाणि मनो बुद्धिः " भगवद्गीता ३-४०

माझ्या शोकस्थितिविषयिंची कल्पना कीं प्रभूला
नाहीं झाली ह्मणुनि करुणा नाहिं आली तयाला ?
बाळा ! तर्कें तुजसि हि तिचें जाहलें नानुमान
या योगें त्वां त्वरित वरिलें स्वर्गलोकीं प्रयाण.

[ २६ ]

मी एकान्तीं बसुनि रडतों पर्वतीच्या तळ्यांत
तेथें सुद्धां क्षणभर न हो शान्ति माझ्या मनांत ।
ठेली माझ्या मनिं विरसता तीच कीं त्वद्वियोगीं
तोयाभावें मजसि गमतें बिंबली त्या तडागीं !

स्वच्छंदानें वनिं विहरतां, झोंप घेतां पडोनी
किंवा दांतीं हरळि खुडितां, चाखितां थंड पाणी
व्याधें पोटीं शर रुतविला, त्यासि घेऊनि रंकू
धांवे, तैसे दिन ढकलितों वाहुनी शोकशंकू.

[ २७ ]

त्वत्प्रेमातें स्मरुनि लिहिली एकही ओळ नाहीं
ऐसा जातां दिवस चुकल्यासारखा भास होई ।
वाटे गेला दिवसचि फुका टाळितां नित्यकर्मा
आलस्यानें जणुं विसरलों स्त्रीयवात्सल्यधर्मा.

जातो कैसातरि दिवस तो कामकाजांत माझा
संलापीं, वा पठनिं, अथवा लेखकर्मांत राजा !
रात्रौ शय्येवर पहुडतां तूं, तुझी गोष्ट कांहीं
शोकाग्नीतें ज्वलित न करी होइना हें कधींही !

येतां कोणी जन मजकडे वा ! समाचार घ्याया
झालें कैसें तुजसि दुखणें लागती हें पुसाया ।
नामोच्चारा तव परिसतां अश्रु डोळ्यांत येती
वाटे मातें उगिच खपली काढुनी दुःख देती !

कोणी जातां दुरुनि तुझियासारखा राजमार्गीं
न्याहाळूनी उगिच बघतों त्याजला मी अभागी !
माझा राजा पुनरपि मला एवि भेटेल काय
वेडी ऐसी मम मनिं उठे कल्पना हाय ! हाय !

[ २८ ]

पर्जन्यानें जलमय कधीं सर्व भूभाग होई
कुल्या, वापी, सम, विषम वा भेद कोठें न राही ।
आतां शोकें किमपि नुरलें हास्य, गेला विनोद
सर्वां भावां निरसुनि मनीं राहिलासे विषाद.

चित्तीं माझ्या सततचि तुझा ध्यास हा लागलासे
वेडें झालें मम मन तुझ्या सद्गुणाच्या विकासें ।
त्वद्विश्लेषीं स्मृति हि तुझिया सद्गुणाची मनातें
लागे माझ्या मधुर, न कधीं तृप्ति चित्तांत होते !

शीतें सांठे हिम गिरिगुहागव्हरीं सान्द्र जैसें
प्रीतीचेही थरचि जमती अन्तरङ्गांत तैसे ।
ग्रीष्मीं जैसें हिम वितळतें चण्डसूर्यप्रतापें
अन्तस्तापें थर वितळती प्रीतिचे अश्रुरूपें.

शोकाब्धीला प्रबल भरती येतसे वेळुवेळां
नाहीं ठावी इतरजलधींसारखी त्यास वेळा ।
केव्हां ही त्वत्स्मृतिवश गळूं लागती बाष्पबिन्दू
चित्तक्षोभा करिशि सखया! तूं कलानाथ इन्दू!

जेव्हां तेव्हां स्मरण घडतां जीव हा होय गोळा
वाटे केव्हां तव मधुर तें रूप पाहीन डोळां ।
स्वर्गीं गेल्यावर जरि तुझी भेट बाळा! घडेल
या नेत्रांचें मज गमतसें पारणें वा! फिटेल!

[ २९ ]

त्वन्मातेची किततरि सुता जाहलीसे निराशा!
कैसा तीच्या अहह! हिंसका बैसला प्रेमपाशा !
प्रेमें केलें जतन तुजला लाडक्या! वीस वर्षें!
त्याचें आतां अहह! करि ती पारणें अश्रुवर्षें!

माझा राजा अझुनि न असे जाहला फार मोठा
बी. ए. होतां उपवर वधू शोधितां काय तोटा?
तो विद्येनें खचितचि असे या कुलाचा प्रदीप
साजे ऐशी करिन बघुनी नोवरी सुस्वरूप.

काळें मोठा उचित मिळतां त्याजला रोजगार
तो ज्येष्ठाचा करिल हलका थोर संसार-भार!
प्रेमें त्याचा बघुनि सगळा थाटलेला प्रपंच
डोळे माझे निवतिल जगीं धन्य होईन साच.

ऐशा तीच्या कितीतरि मनीं लालसा रूढ झाल्या !
त्वांही बाळा ! स्वगुणसलिलें सर्व त्या पोशियेल्या !
एकाएकीं अदय विधिनें पार निर्मूळ केल्या !
आतां तीच्या हृदयिं गरता मात्र ठेवूनि गेल्या !

[ ३० ]

प्राक्कर्माचें फळ ह्मणुनि जो पातला दुःखभोग।
तो धैर्यानें सहन करिते माउली त्वद्वियोग।
नाक्रंदे, ना ढळढळ रडे, स्तंभिते शोकभार
मर्मीं त्याचें जहर भिनलें तें दिसे आरपार !
तें ओष्ठांचें स्फुरण, कुटिल भ्रूहि संकोचलेली
तें नासेचें धमन, वदनीं कान्ति कोमेजलेली।
अन्तर्यामांतिल गहन तो शोक या इंगितांनीं
मूकत्वानें प्रकटचि तिचा तो न तैसा वदोनी !

[ ३१ ]

केव्हां सुद्धां शिशुपणिं तुवां हट्ट नाहींच केला !
कोणी रागें तुजसि भरलें नाठवें माउलीला !
भावंडांशीं कलह अथवा केधवांही अबोला
नाहीं केला ! प्रकृति-गुण हा जन्मतःसिद्ध ठेला !
आहे अन्या अभिलषित जें सौख्य कर्मेन्द्रियांचें
आधीं भासे अमृत, विष जें मागुतीं होय साचें।
आसक्ती त्या सुखिं तुजसि बा ! सर्वथाही नकोशी
होती भू ही त्यजिलि म्हणुनी यौवनाच्या प्रवेशीं.

[ ३२ ]

वेळोवेळीं करुनि बहु त्वां दाविलें कौतुकातें
नाहीं आम्हांकडुन घडलें चीज त्याचें कसें तें !
उंचीं वस्त्रें नच तुज मनासारिखीं म्यां कधींही
किंवा खाऊ तुजसि दिधला, हें मना आज खाई.
त्वद्बन्धूनें तुजसि दिधला रेशमी जो रुमाल
तो त्वां बाळा ! प्रथम दिवशीं घातला एकवेळ !
नाहीं त्याची फिरुनि घडिही मोडली, वेष साधा
केला, यावी जणुं न कधिंही योगसिद्धींत बाधा !

[ ३३ ]

प्रेमें राजा ! प्रतिकृति तुझी रंगवी बन्धुराया
येती अश्रू नयनिं, न मला देति ते ती पहाया ।
पद्यें कोणी सरस रचिती त्वद्गुणा आठवोनी
तीही त्यांची नच परिसवे तीक्ष्ण शोकार्तवाणी.
जो येई तो सण मम मना दुःख अत्यन्त देतो
जो शोकाग्नी हृदयिं धुमसे तो पुन्हां पेट घेतो ।
झाल्या गेल्या फिरुनि कधिंही ज्या न होणार गोष्टी
त्या त्या चित्तीं स्मरुनि मम हा होतसे जीव कष्टी.
खिन्ना चित्ता असुखकर ती होय अभ्यङ्गवार्ता
मिष्टान्नातें सजलनयनीं खेंति येई पहातां ।
अन्यातेंही बघुनि नटतां वाटतो पोटिं हेवा
जातो कष्टें दिवस, रुचलें तेंच देवाधिदेवा !

[ ३४ ]

पद्यांमध्यें न सजति अशा शुष्क सामान्य गोष्टी
व्हावी कैंची अनुचित कथाभागिं सौरस्य-पुष्टी ?
ऐसें कोणी पुसतिल, सुखें यापरी ते पुसोत !
वैदग्ध्याचे रसिक निधडे तेचि लोकीं असोत !

चित्तीं माझ्या खळबळ किती चालते सर्वकाळ
ती मी सांगे, मग मजकडे येतसे काय बोल ?
शोकक्षोभव्यथितजनहृद्भावनाचित्र ज्यांतें
वाटे दोषास्पद, करितसे मी नमस्कार त्यांतें !

सांगावें बा ! तुज सकलही आपुल्या हृद्गतातें
या हेतूनें करिं धरुनियां बैसलों लेखनीतें ।
जें जें माझ्या मनिं उमटतें, सांठवीं पत्रिं तें तें
नोहे चिन्ता, बरळ रसिका मान्य होते न होते !

[ ३५ ]

नेलें बाळा ! तुजसि न यमें शैशवीं गोंवरानें
जेव्हां आशा तुजविषयिंची सोडिली माउलीनें ।
वेणुग्रामीं* तुज खिळियलें जेधवां बा ! क्षयानें
तेंव्हां सुद्धां मजवर कृपा-छत्र केलें हरीनें.

* बेळगांव

होतें विद्यार्जन न पुरतें जाहलें तेधवां कीं ?
किंवा होती प्रगति न तुझी जाहली कां विवेकीं ?
योगाभ्यासें न तव सृतिचा सिद्ध संभार झाला ?
त्या योगें त्वां मनुजभुवनीं वास बा ! लांबवीला ?
अन्योन्याचें ऋण न फिटलें, भावि उत्कर्ष किंवा
व्हायाचा त्या अवसर नसे लाभला काय तेंव्हां ?
वांटा माझा अशुभ उरला शोकरूपी ह्मणोनी
तो फेडाया इह जगिं तुवां वास केला फिरोनी.
जें जें केलें शुभ अशुभ वा म्यां तुला पूर्वदेहीं
त्याचें त्याचें फळ मज दिलें, संगती अन्य नाहीं।
होतें घेणें मजकडुनि तें घेतलें, शोकरूप
व्याजासुद्धां, सकळ फळलें येथ माझेंचि पाप !
प्राक्कर्मांचा जरिच नसता योग कां त्वां अकालीं
स्वर्गीं केलें गमन, मज ही बाष्पबिन्दुप्रणाली ?
नोहे आतां मज इह समाश्वासनोपाय अन्य
मी शोकीं, तूं सुचरितबलें स्वर्गलोकांत धन्य !
माझ्या पोटीं जनन वरिलें त्वांहि देवास बुध्द्या
साधायातें गुणसमुदया इष्ट संस्कारसाध्या !
माझ्या पापें मजसि घडला शोक, इष्टार्थसिद्धी
झाली, राजा ! तुजसि, सगळा योग कर्मानुबन्धी !

[ ३६ ]

नेलें बाळा ! तुजसि तुझिया जन्मलग्नग्रहांनीं
ऐसा बोलें बघति करण्या मत्समाधान कोणी।
आयुर्दाय ग्रह नियमिती हें जरी सत्य होय
प्राग्जन्मींचें सुकृत दुरित व्यर्थ तें सर्व काय ?

हें तों नोहे परि मज गमे भावि अर्था, अनर्था
स्वस्वस्थानें ग्रह सुचविती, ईश तो एक कर्ता।
जैसें सामुद्रिक करपदोत्कीर्णरेखादिकांनीं
दावी भाग्यस्थिति तशिच ते सांगिजे कीं ग्रहांनीं

[ ३७ ]

सांगे कोणी स्मरण न तुम्ही गेलियाचें करावें
होतां तेंही अगतिकपणें तत्क्षणीं आवरावें।
हें तो सारें मजसि समजे, प्रीतिची ही कसोशी
हो ऐशी कीं, क्षणहि न तिची होय पोटीं असोशी!

झाला नाहीं मजसि तुजसा पुत्र ऐसें म्हणावें
त्वच्चारिऱ्या निजमनिं सुख-स्वप्नसें म्यां गणावें।
ऐसें कोणी मजसि म्हणती, शक्य व्हावें कसें तें
जो मी नाहीं मनिं विसरलों आपही आपणातें. ?

[ ३८ ]

नाहीं, नाहीं, स्मृति तव मनीं होउं देणार नाहीं!
पूर्वाण्हीं हा नियम करितों तो फुका सर्व जाई।
येई जैसा दिवस चढुनी, ढासळे नेम तैसा
चन्द्रालोकें जलनिधिस हो क्षोभ जैसा अपैसा.

रात्रीं शय्येवर पहुडतां मूर्ति डोळ्यांसमोर
ठाके सारा मग लटपटे मानसींचा विचार।
"अप्पा" ऐसा अचुक निघतो शब्द तोंडीं अपाप !
येई तैसा कुशिस वळतां, कोठची गाढ झोंप ?

स्वप्नामध्यें उडुनि तुझिया खोलिच्या दारिं जातों
कानोसा मी क्षणभर उभा राहुनि तेथ घेतों ।
झोंपी गेला असशिल असा भास चित्तांत होतो
जागा होतां क्षणिं फिरुनियां पेट शोकाग्नि घेतो.

[ ३९ ]

शोकावेगें न कळत असे वाढली पद्यमाला
एकामागें सहज दुसरा श्लोक बाहेर आला ।
जैसें एकावर सुम दुजें भक्त देवास वाही
तैशीं पद्यें स्मृतितनुवरी वाहतों मी तुझ्या हीं.

कांहींबाहीं लिहित सुटलों, नार्थ वा शब्द गोड
कोणी कांहीं म्हणुंत, मजला त्वत्स्मृतीचीच चाड ।
देवा अर्पी भजक सुमनें मोगरा वा कण्हेर
भावीं गोडी धरुनि तुज हा अर्पितों पद्यहार.

किंवा, जैशी वरिवरि मुके माउली तान्हुल्याचे
घेई प्रेमें, परि न पुरती कोड तीच्या मनींचे ।
तैसें आतां बहु परि तुला लाडक्या ! आळवावें
ऐसें वाटे, स्मरुनि तुजला चित्त हें रंजवावें !

[ ४० ]

होतें ठावें जनमदिवसा पासुनी पुण्यशील,
माझ्या आधीं परि पितृगणीं जाउनी बैसशील ।
हें तों ध्यानीं नच कधिं मनीं स्वप्निंही नाहिं आलें
मद्दुर्दैवें उलट सगळें तेंच बा आज झालें !

माझ्या मागें मजसिच तुवां आत्मजें पिंड द्यावे,
देतां ग्यां ते उलट तुजला केंवि बाळा रुचावे !
नामोच्चारें उदक तुजला तर्पणीं नित्य देतां
कैंची तृप्ती तुजसि ? रुचलें कासया हें कृतान्ता ?

कोठें अंगा जखम पडतां ती बुजाया उपाय
योजी सारा जन, परि तसा काळिजालागिं घाय ।
होतां, ठेवी जखम उघडी, दे तयाचीच साक्ष
प्रत्यब्दीं जें स्मरुनि पितरां योजिती श्राद्धपक्ष.

शोकीं ऐसा व्यतिकर असे प्रीतिचा, कीं तियेच्या
आधिक्यानें प्रियचि गमती यातना त्या मनाच्या !
ती प्रेमाची ठळकहि छटा शोभवी शोकवर्णा
कीं तद्योगें करुण रस ही शोभते त्यास संज्ञा.

[ ४१ ]

आतां भेटी मजसि घडणें शक्य बा ! लिङ्गदेहीं
ऐसें कोणी मजसि कथिती, तींत ही विघ्न राही ।
होतां भेटी असुख तुजला प्राप्त होईल ऐशी
आहे शंका तरि मज तुझी भेट वाटे नकोशी !

नाहीं गेला, परि जडतनू सोडुनी मुक्त झाला !
आहे आह्मांजवळिच जरी लिङ्गदेहांत ठेला ! ।
ऐसें कोणी ह्मणति, परि तो राहिला काय गेला !
दोन्हीं आम्हां समचि जरि या नेत्रिं पाहूं न त्याला !

[ ४२ ]

जन्मा आल्यावर जरि नरें नाद्भुतोद्योग केला
लोकीं सारे जन ह्मणति कीं बापुडा व्यर्थ मेला !
आयुर्दाया जरि नच दिलें बुद्धिची तीक्ष्णताही !
सारी होई विफल, मतिचें चिन्ह राही न कांहीं !

या दृष्टीनें विषम गमतें अल्पजीवित्व लोकीं
जाणारातें अफल करुनी बान्धवां पाडि शोकीं ।
ऐसा कैसा अनय उघडा ईश्वराच्या कृतींत !
कोडें मोठें नच उकलण्या शक्ति मानुष्यधींत.

अन्तर्यामीं मम उठतसे जेधवां हा विचार
होई तेव्हां प्रबळ पहिला शोक तो दुर्निवार ।
वाटे देवें मजवरि अशी आग कां पाखडीली
आधीं ताटीं अमृत भरुनी मृत्तिका कालवीली ?

[ ४३ ]

वेडे आम्हां करुनि तुजला काय देवा ! मिळालें ?
देतां आलें तुजसि नसतें दुःख कां बा निराळें ?
किंवा शिक्षा उचित दिसली नान्य कांहीं म्हणोनी
आनंदाचा अहह ! अमुचा कंद नेला खुडोनी ?

म्यां आरोप प्रभुपदिं परी कासया हा करावा ?
ज्याचा त्यानें स्वविषय पुन्हां घेउनी कां न जावा ?
माझ्या सौख्यास्तव मज दिला वीस वर्षें म्हणोनी
कां तें त्याचें अचल पहिलें स्वत्व गेलें उडोनी ?

[ ४४ ]

अल्पायूंतें स्थिति कवण ती प्राप्त होई परत्र
ठावें नाहीं; खचित पितरां क्लेश अत्यन्त मात्र !
कीं पुत्राचें निधन पितरां नेमिली घोर शिक्षा
लोकेशानें, तरि मग तया मागतो हीच भिक्षा !

" बा विश्वेशा ! सकल तुजला ठावकें पापपुण्य
नेमी पाप्यां तनय–निधनावांचुनी दण्ड अन्य।"
वेळोवेळीं हृदयिं सलतें शल्य जें कीं स्मृतीचें
त्यापेक्षां तें मरण बरवें वाटतें एकदांचें !

श्रेय प्रेय प्रसभ मनुजा प्रेरिती भिन्न मार्गी
श्रेयाची ती मनुजहृदयीं वासना नित्य वागे
त्या दोघांचें अति तुमुल तें युद्ध चित्तांत चाले !
द्वैधीभावें उभयहि तटीं घेतसे चित्त झोले !

चित्तोन्माथी सतत, परि तो शोकही प्रेय वाटे
यत्नें त्याचें दमन जरि तें सर्वथा श्रेय मोठें।
प्रेमावेशा पुढति न मनःस्थैर्य ठाके बिचारें
प्रेयाचा हो विजय, सरतें श्रेय तें पाठमोरें !

शोकीं सुद्धां नकळत नरा होतसे लाभ मोठा
ज्ञानैश्वर्यादिक मद जिरे, मोडतो सर्व ताठा।
होते भक्तिप्रवण इतर व्याप सांडूनि बुद्धी
शोकाग्नीनें खळमळ जळे, होतसे चित्तशुद्धी।

या मर्त्यांच्या भुवनिं अमुचा जन्म झाला, तरी ही
सूक्ष्माकारीं स्थिर अमरता–बीज आत्म्यांत राही ।
शोकीं त्याची पदिंपदिं मनीं स्पष्ट जाणींव होते
देवापायीं दृढ भरवसा तीच चित्तास देते.

[ ४५ ]

कोणी मातें ह्मणति " गमतें दुःख देण्या तुह्मांला
प्राग्जन्मींचा रिपुचि तुमच्या पोटिं जन्मास आला" ।
त्वत्प्रेमाचा अनुभव जया लाभला अल्पकाळ
साहे त्यांच्या श्रवणिं न अशा कल्पनेचा विटाळ !

होतें विद्याव्यसन तुज तें पूर्ण येथें कराया
येशी जन्मा पुनरपि, जनीं नांव ही गाजवाया ।
ऐसें कोणी मजसि कथिती, अन्यथा तेंहि वाटे !
गेले कार्य त्यजुनि अपुरें काय ना मोठमोठे ?

आहे मर्त्या अभिलषित ती सर्वथा कार्यसिद्धी,
ईशाला तों अभिमत असे एकटी चित्तशुद्धी ।
ती झाल्या तो नच बघतसे कार्य झालें, न झालें,
त्याचें साध्यावरि, न लवही साधनीं लक्ष्य ठेलें

[ ४६ ]

माझ्याहूनी अधिक असुखी शेंकडों या जगांत
ऐशी आहे स्थिति, बघुनि हें चित्त व्हावें प्रशान्त !
या शोकाचा प्रसभ परि ये वेग ऐसा प्रचण्ड
कीं तर्कास्त्रें न पळभरही होय त्यामाजि खण्ड

विद्युत्पातें कितिक मरती, बाष्पयानापघातें
नौकाभङ्गें कवण अथवा शैलशृंगप्रपातें।
ऐसे मृत्यू अचुक घडती तेथ दैवास दोष;
रोगोपाया करुनिहि कसा जाहलों मी हताश !

[ ४७ ]

नैरन्तर्यें सुखाचि कवणा प्राप्त हो या जगांत ?
किंवा दुःखें सतत कवणा सारखीं ग्रासितात ?
जाई खालीं वरति अथवा चालती धांव जैशी
राहे भाग्यस्थिति इह जना उच्च वा नीच तैशी।

कालाब्धीच्या उदरिं, निपजे रत्न दैदीप्यमान
तें ठेवाया पुट न गवसे त्याजवांचूनि आन।
ऐसें आहे अवितथ, तरी तें हि डोळे भरूनी
पाहूं नेदी, परि अचुक कां ईश ने तें हरूनी।

[ ४८ ]

बापापेक्षां म्हणति मुलगा जाहला हा सवाई
या शब्दांनीं मजसि गमली हीच माझी बढाई।
शिष्याहातीं परिभव नसे गोड कोणा गुरूला ?
पुत्रोत्कर्षें मनिं न कवणा धन्यता हो पित्याला ?

आगाशांचे कुलिं कवणही मूर्ख होणार नाहीं
एकाहूनी वरचढ दुजा दावितो कारवाई।
ऐसा झाला अनुचित मला गर्व मोठा म्हणोनी
नेला माझा अनुपम हिरा धर्मराजें हरोनी।

[ ४९ ]

ही दुःखाची वसति अवघी, ही नव्हे पुण्यभूमी
ह्या बुद्धीनें गमन वरिलें शीघ्र कां सौख्यधामीं?
जों जों आला अनुभव तुला दुर्जनांचे कृतीचा
तों तों कीं रे! मन उबगलें वीट आला जगाचा?

*डामेडाचा प्रिय सुत रणीं पावला पञ्चतेला
" मी फ्रान्सातें समरविजयी वीर तो अर्पियेला"।
डामेडोक्ती परिसुनि अशी, वाटतें वाढवोनी
झालों मीही सुरगणिं तुला धन्य कीं बैसवोनी.

[ ५० ]

ग्रीष्मीं केंव्हां अवचित उठे हस्तिसा कृष्ण मेघ
त्याच्याभोंतीं रजतमयशी भासते सूक्ष्म रेघ।
वृष्टी झाल्यावर करितसे ती तमाचा विनाश
मोदें सारें भुवन भरितो भास्कराचा प्रकाश.

तैसें दुःखापुढति सुखही ईश्वरी योजनेंत
राहे ऐसा अनुभव किती प्राज्ञही वर्णितात।
हें तों आश्वासन नच जरी दुःखिता मानसातें
नेणों आम्ही जडमति खऱ्या ईश्वरी योजनेतें!

[ ५१ ]

या लोकींची स्मृतिहि तुजला दिव्य लोकीं नसेल
तेथें ही त्वन्मति तव नव्या कार्यभारीं रमेल।
वारंवार स्मरुनि तुजला कासया शीणवावें?
माझ्या सौख्यास्तव तव सुखाआड कां व्यर्थ यावें?

* डार्डेनेल्सच्या रणक्षेत्रावरील फ्रेंच सेनापती.

तूं सत्त्वाचा निधिच बरवा येशि अन्यत्र कामा
नेलें ईशें इह जनिं तुला पाहुनी पूर्णकामा ।
किंवा नोहे तव मजसवें शक्य *उत्थान भावी
त्वज्जीवात्म्यास्तव मम न ही हानि बा ! म्यां गणावी!

[ ५२ ]

मर्मीं घाता करुनि विधिनें सर्वथा हीन, दीन
केलें मातें, तळमळ उणी ती न अन्या कथून ।
दुःखें मित्रा कथुनि हलकीं होति ऐशी जनोक्ती
येतें आतां मजसि उलटी या प्रसंगीं प्रतीती !

माझ्या दुःखें व्यथित रडती मित्र माझे अनेक
बाष्पव्याजें सदय मम ते वांटुनी घेति दुःख
ही तों त्यांची अति सुजनता, ते खरे सत्वशील
अन्यार्तीनें द्रवति हृदयीं ते मनाचे मवाळ !

पुष्पांपेक्षां मृदुल कविचें चित्त होतें ह्मणोनी
गेला दुःखें कळवळुनि तो क्रौंचघाता बघूनी ।
दुःखें त्याच्या हृदयिं फुटला शापरूपी उमाळा ।
तो काव्याचा उदय पहिला श्लोकरूपेंच झाला !

[ ५३ ]

जो दुःखानें दशम दिवशीं पिण्ड म्यां अर्पियेला
काकें हां ! हां ! ह्मणत म्हणतां तो क्षणामाजि नेला ।
ठावें मातें न तव सखया ! गुंतली येथ आशा
माझ्या चित्तांतुनि सरक जा ! तोडिं या प्रेमपाशा !

* उत्थान Evolution.

माझ्याभोंतीं सतत घिरट्या कासया घालितोसी ?
बाळा ! माझ्या अभिमुख असा कां उभा राहतोसी?
तूं पाषाणीं, स्थळिं, जळिं, तसा काष्ठिं कां भासतोसी,
ब्रम्हीं होतां लय भुवन कीं व्यापुनी राहिलासी !

जा ! जा ! बाळा ! नच खवळिं या तीक्ष्ण शोकार्तचित्ता !
दे विश्रान्ति क्षणभर तरी ! थांबु दे अश्रुपाता !
तूं गेलासि त्यजुनि सखया दुःखरूपी जगातें !
कां बा ! मागें वळुनि बघसी ? आठवे काय तूंतें ?

[ ५४ ]

या संसारीं सुख जवभरी दुःख अद्रीसमान
हें संतांचें वच अनुभवें आज आलें कळून ।
झालें राजा ! सुख मज तुझ्या गोडशा अल्प संगें
त्याच्याहूनी शतपट मला दुःख बा त्वद्वियोगें.

देवाज्ञेनें मरण घडतें हाच तत्वार्थ गूढ
' देवाज्ञा ' हें पद सुचवितें, शब्द तो योगरूढ ।
त्रैलोक्याच्या प्रभुस रुचलें, त्यापुढें काय चाले ?
भोगावें तें निमुटपणिं जे भोगणें प्राप्त झालें.

[ ५५ ]

गेले कोठे नरपति बली पांडवांच्या समान ?
विद्यावाचस्पति इतरही शिल्पविद्यानिधान ?
जन्मा आले, नवल करुनी दाविलें आणि गेले !
तत्साक्षित्वें अचल धरणिक्षेत्र हें एक ठेलें !

ही मर्त्यांची वसति, मरणापासुनी मुक्त कोण ?
आहे मृत्यु प्रकृतिच असें सांगती जे सुजाण ।
कोणीसुद्धां न मनिं करिती मृत्युराहित्यकांक्षा
दीर्घायूची सहजचि असे जन्मल्यातें अपेक्षा.

[ ५६ ]

मालाघातें *अजनृपवधू स्वर्गवासास गेली
ईशेच्छेनें अमृतहि विषप्राय हो प्राप्तकालीं ।
बाळा ! आलें तुजसि दुखणें ईश्वरेच्छानुरोधें
ईशेच्छेचें विकल हृदया ! घे समाधान साधें !

[ ५७ ]

आहे मृत्यु प्रकृति, विकृती जीवित स्वल्पसुद्धां
लाभावासी मनिं समजणें याच तत्वावबोधा।
शिष्यद्वारा करुनि गुरुनें सान्तवीला नृपाल[1]
मानूं तोही सुखचि घडला संग जो अल्पकाल !
दुष्टें दैवें अदय मतिनें हारुनी प्रेमपात्र
अन्तर्यामीं लिखट जहरी रोंविलें शल्य मात्र ।
ऐसा चित्तीं भ्रम बहु, परी नेणतों कीं, मृताला
मृत्युद्वारा सुघड पुढचा मुक्तिचा मार्ग झाला !
शोकावेगें न अनुसृतिही दे पुनः संगमातें !
प्राणत्यागी मृतहि मिळती स्वस्वयोग्यास्थितीतें ।
ऐसी आहे स्थिति जर खरी कासया मी शिणावें ?
राजारामा ! रडरडुनि ही कां तुला शीणवावें ?

* इंदुमती. १ अज.

[ ५८ ]

ठावें लोकीं घटहि घडतां जाति कांहीं फुटोनी,
कांहीं चाकावर, किति अव्यामाजि जाती उलोनी।
तैसे जाती शिशु, तरुण वा वृद्धही प्राप्तकाल
ब्रम्हाण्डाच्यां घटनिं गमतो तो विधाता कुलाल.

[ ५९ ]

हा जीवात्मा वसति करितो कोणत्या इन्द्रियांत
आहे वायु, द्रव, इतर वा मूर्त ऐसा पदार्थ।
येई कैसा जननिं, मरणीं जाय कैसा निघोनी
ये राखाया चिर, सतत वा काय तो औषधांनीं ?

हें जीवाचें गहन सुटलें नाहिं कोणास कोडें
तें सोडाया बुध न खपले आजपर्यंत थोडे।
जन्मप्राप्ती, मरण, उभयें होतसे मर्त्य मूढ.
वाटे केलें सुदृढ पट हे झांकण्या सृष्टिगूढ.

[ ६० ]

कोठें गेला असशिल ? तुझें काय झालें असेल ?
ऐशी माझ्या हुरहुर मना लागली सर्वकाळ।
ही चित्ताची तळमळ मिटे कैंवि ? ऐशा विचारें
द्वैधीभावें मम मन किती खाय झोले बिचारें.

देहत्यागावर गति पुढें होय कैशी परेता
हें सांगाया क्षम अनुभवें कोणता तत्त्ववेत्ता ?
जो गेला तो परतुनि पुन्हां येथ नाहींच आला
तर्क-श्रद्धा-रहित न तिजा मार्ग हें जाणण्याला.

या विश्वाची सुरळित घडामोड चाले कशानें ?
कोणी ज्ञाते म्हणति सगळी ती यदृच्छाबलानें ।
भूतें सारीं क्रमरहित तीं वर्ततां ही निजेच्छा-
मात्रें कैशी नियमन करूं शक्त होई यदृच्छा ?

विश्वामध्यें अमित भरलें गूढ तें आकळाया
शास्त्रें यत्ना करिति परि ते सर्वही जाति वायां ।
तर्कांची हो प्रतिहत गती शोधुं जातां अनन्ता
ना दे श्रद्धेविण इह दुजा मार्ग शान्तीहि चित्ता.

ज्याचा विश्वीं भरुनी उरला योजनेचा प्रकर्ष
यत्सामर्थ्यें स्थिरचरजगीं हो न विच्छेदलेश ।
यत्सत्तेनें सरळ अवध्या सृष्टिचें कार्य चाले
ज्याचे आज्ञेविण न तरुचें एकही पान हाले.

ज्यानें येथें चर-अचरही ओंविलें एक सूत्रीं
एकाहूनी वरचढ दुजा निर्मुनी हे धरित्री ।
श्रेणी केली सरळ चढत्या पूर्ण सत्त्वोदयाची
पारंपर्यें सराणिच परब्रम्हरूपीं लयाची.

नानारंगीं सजविलि जयें विश्व ही रङ्गभूमी
भूतें पात्रें, नटविलिं जयें देउनी वेष नामी।
अज्ञेयाचा पट करुनि जो पाटवी नाट्यकार
संसाराचा अभिनय करी जो स्वयें सूत्रधार !

उद्भिज्जाच्या उपरिच तयें प्राणिमात्रा अशेष
स्वोद्धाराला उचित दिधला तारतम्यें चिदंश।
देहत्यागावधि मिळविली सत्वशुद्धी तयेचा
एकाएकीं निधनसमयीं अंतही योग्य कैंचा ?

तिर्यग्योनीहुनि मनुज हा श्रेष्ठ, मानुष्यकाच्या
सोपानानें उपरि चढतां वास लोकीं वसूंच्या।
ऐसा आहे क्रमचि हरिनें लाविला भूतमात्रां
त्या मार्गानें सफळ करणें सर्व संसारयात्रा.

[ ६१ ]

जे अल्पायू तुजसम सुता! लंघिती अल्पकालीं
ह्या सोपाना, निजसुचरितें, धन्य ते पुण्यशाली।
देवांनाही प्रिय म्हणुनि त्यां देवही शीघ्र नेती
पाचारूनी, विदितचि असे लोकिं ही देव-रीती.

चाले सृष्टी सकल नियमें, तींत अन्याय कैंचा ?
उत्थानाचा नियमचि असे उच्छ्या सेवण्याचा।
झालें सारें तव इह जगीं कार्य जाणूनि नेलें.
मानुष्याच्या वरचढ पदीं नेउनी बैसवीलें.

9338

[ ६२ ]

काठी हातीं धरुनि जपुनी भोंवतीं सादृ घेत
जाती जैसे हळुहळुं पथीं आंधळे भीत भीत।
श्रद्धायष्टी धरुनि बुधही अंध जन्मानुबन्धें
आयुर्दाया क्रमिति जपुनी आप्तशब्दानुरोधें.
नानाधर्मीं विविधहि मतें जाहलीं रूढ लोकीं
त्यांचें तत्त्वग्रहण करितां मेळ ना एकमेकीं।
ज्यांचे जैसे अनुभव तसे त्यांहि केले विचार,
त्यांच्यामध्यें निवड करण्या पामरा नाधिकार.

[ ६३ ]

सारासारग्रहण करितां वाटतें या मनातें
कीं हा आत्मा जरि अवतरे घेउनी संचितातें।
व्हावा त्याचा लय तरि, उगा कासया देहपातें
या जन्मींचें सुकृत अवघें काय जावें लयातें?
सर्वस्वाचा लय, जरि असों बाहुलीं मृत्तिकेचीं;
भूतग्रामीं स्वमतिविभवें श्रेष्ठता मानुषाची।
आत्मज्योती हृदयिं विलसे हानि कैशी तियेची?
पुण्याईला नच कधिं चुके जोड शश्वत्सुखाची.

[ ६४ ]

विज्ञानानें लव न उकलें सृष्टिचें तत्व गूढ,
चालेना बा ! मनुजमतिचा तेथ केव्हांहि पाड।
यासाठीं त्वां प्रगति करुनी स्थूल विज्ञानमार्गीं
ज्ञानीं श्रद्धा अचल धरिली होउनीयां विरागी.

अज्ञानानें विवश दुबळा जीव जातो भिऊनी
वाटे त्यातें खचित मरणें होय सर्वस्व-हानी ।
या भीतीचें निरसन असे शक्य एक्या उपायें,
तोही मर्त्या सुगम करुनी ठेविला देवरायें.

देवापायीं दृढ भरंवसा ठेवुनी वावरावें
कर्तव्यातें विहित म्हणुनी निःस्पृहत्वें करावें ।
आयुर्दायावधि सुकृत तें निश्चयें आचरावें,
मृत्यूचें हें भय मग बुधें शान्तचित्तें तरावें.

ऐशी शान्ती कितिक सुजनीं जोडिली आजवेरी
वानूं त्यांची कृपणमति मी केंवि अत्यन्त थोरी ?
पूजा अर्चा प्रतिदिवसिंची सारुनी सिद्ध झाले !
कोणी देवा नमन करुनी देह ठेवूनि गेले !

साक्रेतीसा मरणदिवशीं लागली गाढ निद्रा !
त्याची नित्याहुनि अधिक ती भासली हृष्ट मुद्रा ।
" मृत्यूनें हें मम पुरविलें जीविंचें आज कोड "
ऐसें त्यानें विशद कथिलें शान्तिचें तत्त्व गूढ !

जी मृत्यूचें भयचि नुरवी ती खरी तत्त्वसिद्धी
जीवात्म्याची परमफलदा ती खरी सत्त्वशुद्धी ।
हृद्ग्रन्थींचा सकलहि जयें होय अत्यन्त भेद
सन्देहातें निरसि पुरता तो खरा तत्त्वबोध.

[ ६५ ]

"क्लीबत्वातें न धरिं न करीं मानसीं शोकक्लेश"
कौन्तेयातें हरि करितसे हाच धर्मोपदेश ।
सौभद्राचे निधनिं गिळिला शोक कुन्तीसुतानें
म्यांही तैसा तव विरहिं कां नावरावा धृतीनें ?

[ ६६ ]

जैशीं जीर्णं त्यजुनि वसनें मर्त्य लेई नवीन
आत्मा देहान्तर करि तसा पूर्व देहा त्यजून ।
ऐसें गीतावचन, न मना दे समाधान आन
संसाराचें गहन विवरी तत्त्व वा सप्रमाण.

जन्मामागें मरण, मरणामागुती जन्म येई
अस्तामागें उदय, उदयामागुती अस्त होई ।
हा सृष्टीचा क्रमचि गमतो त्याजला नापवाद !
ह्या शोकाचा विसर पडण्या हा खरा तत्त्वबोध.

[ ६७ ]

एकामागें ढकलत दुजा वारि-बिन्दु प्रवाहीं
जाई जो तो परतुनि न ये मागुती केधवांही ।
या भूलोकीं नियतिवश ते वाहुनी जीव-बिन्दू
जाती त्यांतें सतत उदरीं सांठवी कालसिन्धू.

अब्धीमध्यें सलिलगतिनें काष्ठ काष्ठासि भेटे
काळें जाती निघुनि पवनें दूर तीं दोन वाटे ।
भूतांचाही नियति गतिनें कालसिन्धुप्रवाहीं
होतो संग प्रथम, पुढती नित्य विश्लेष होई.

एकः गांवा मिळुनि निघती एकमेकांसमेत
कांहीं मार्गे क्रमुनि सगळे जाति मोठ्या सुखांत ।
त्या सार्थातें त्यजुनि पुढती गेलिया पांथ एक
बाकीच्यांनीं उगिच करणें कासया दीर्घ शोक ?

सारे यात्रेकरुच धरुनी एकमार्गा निघालों
पाथेयातें स्वरुचित यथासौख्य सेवीत ठेलों ।
जो स्वोद्योगें अभिलषित तें अन्तिमस्थान गांठी
विश्वेशाची सुखकर तया होतसे शीघ्र भेटी.

[ ६८ ]

आल्या भोगा निमुट सुजनें सादरत्वें नमावें
ओझें देवावर न कधिंही घालुनीयां शिणावें ।
ऐसे सिद्धप्रमुख तुकया सांगतो तें प्रमाण
अध्यात्माचे खचितचि असों सर्वथाही अजाण !

मामा साक्षात्प्रभुवर जगद्वन्द्य गोविन्द ज्याचा
पांचाचाही प्रियकर, कृती पुत्र जो अर्जुनाचा ।
त्या सौभद्रा तरुणपणिंही गांठिलें क्रूर काळें
त्या काळाची उडि चुकविण्या शक्त कोणी न झाले.

अब्धीमध्यें उपल तरले रामनामाक्षरांनीं
या युक्तीनें जलधितरणा सेतु केला कपींनीं ।
जावें त्यांहीं सहज तरुनी शोकरूपा समुद्रा
त्वन्नामाच्या म्हणुनि रचिल्या त्यांहि या पद्यमुद्रा !

[ ६९ ]

तूं पुण्यात्मा, न तव ढळली चित्तशान्ती कधींही
देवें केला तव विरह हा सोसण्या धैर्य देई ।
अन्तश्चक्षूपुढति तव ती सद्गुणाचीच मूर्त्ती
राहो नित्य स्थिर, मधुर ती; तीच देवो प्रशान्ती !

हृत्पाषाणीं सगुण तव जी मूर्ति बा ! कोरियेली
राहे ध्यानस्थित, नयनजें वारिनें पाखळीली ।
नामोच्चारें कवित-कुसुमें वाहुनी भूषवीली
जैशी चित्तीं तशिच नयनीं ती अहोरात्र ठेली !

[ ७० ]

मर्तिपडत्वें तव तनुवरी होति गाढानुरक्ती
ईशांशत्वें तव गुणगणीं राहिली सान्द्रभक्ती ।
मी एकीला जरि विसरलों मर्त्यतेच्या विवेकें
राहो चित्तीं स्थिर मम दुजी चित्सुखाच्या विशेखें !

प्रीती, भक्ती विविध नसती, ऐहिकीं जी स्वभावें
आसक्ती ती प्रथम, दुसरी ईशपादीं स्थिरावे ।
**राजारामीं** प्रियकर सुतीं प्रीति होती अमूप,
ती **श्रीरामीं** परिणत असो पावुनी भक्तिरूप.

पुत्रोद्देशें सहज वदतां नाम नारायणाचें
कोणी विप्रें भय निरासिलें पूर्वकालीं भवाचें ।
जाळी अग्नी सहज घडतां स्पर्श जैसा स्वभावें !
**राजाराम**-स्मरण करितां म्यांहि मोक्षा भजावें!

झाला दैवें विरह तरि बा शान्तिनें त्यास साहूं
तैसें लोकोत्तर तव गुणा प्रीतिनें नित्य गाऊं।
केली प्रीती इह जगिं तशी स्वर्गलोकींहि राहो
विश्वात्माही उचित तुजला सद्गती शीघ्र देवो !

[ ७१ ]

प्रेतोद्देशें सतिल सलिलें अंजली देति लोक !
स्नेहव्यक्ती करुनि तिल ते दाविती गूढ शोक।
प्रेमोद्रेकें क्षुभितहृदयापासुनि जे अपाप
येती अश्रू धरुनि कवनीं देतसें मी निवाप.

वैचक्षण्यें विविध जन हृद्भावनांचा अभिज्ञ
काव्याचाही दृढ परिचयें सर्वथा तूं रसज्ञ।
देतों आतां अकृतक तुला मी नितान्तानुरागें
राजारामा ! कवितसुमनोयुक्त बाष्पाञ्जली घे !

श्रीरामाच्या करुण रुदितें दण्डकारण्यदेशीं
शैलांनींहि रुदन करुनी शान्तवीलें तयाशीं।
ऐसें सांगे प्रथम कवि, तें काव्यचातुर्य कोठें ?
कोठें माझी बरळ? विबुधीं क्षम्य हें धार्ष्ट्य मोठें !

REFBK-0001334

REFBK-0001334